# Appendix 20

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वन व सामाजिक वनीकरण विभागामार्फत घ्यावयाच्या कामासंबंधात मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**
नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
शासन परिपत्रक क्रमांक मग्रारोहयो-२०११/प्र.क्र.८४ /रोहयो-१
दिनांक : ०१ नोव्हेंबर, २०११

## परिपत्रक

**पार्श्वभूमी :**

महाराष्ट्र राज्यात सन १९७७ पासून रोजगार हमी अधिनियमाची अंमलबजावणी सुरु झाली आहे. सदर योजना राबविण्यासाठी सामाजिक वनीकरण आणि वन विभागाचे अनेक वर्षापासून महत्वाचे योगदान होते. परंतु राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सन २००६ पासून सुरु झाल्यानंतर वन विभाग व सामाजिक वनीकरण विभागाकडून आवश्यक त्या प्रमाणात या कार्यक्रमांतर्गत सहभाग झालेला दिसत नाही, याची अनेक कारणे आहेत. त्यातील एक महत्वाचे कारण म्हणजे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्राथमिक माहिती व योजनेची विहित कार्यपध्दती अद्यापही क्षेत्रीय वन अधिकाऱ्यांना योग्य प्रकारे ज्ञात झालेली नाही. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत लाईन डिपार्टमेंटच्या भूमिकेबद्दल जून २०१० पासून आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या आहेत.

भविष्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वन विभाग आणि सामाजिक वनीकरण विभाग हे कार्यान्वीत यंत्रणा म्हणून महत्वाची भूमिका बजावणार आहेत त्यामुळे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची मूळ तत्वे व कार्यपध्दतीचा सारांश पुनश्च वन अधिकाऱ्यांच्या माहितीसाठी देण्यात येत आहे. या मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राबवितांना करणे आवश्यक आहे.

१. **<u>महाराष्ट्रात राबविण्यात येणारा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम व योजना बाबत स्पष्टीकरण</u> :-**

सन २००५ मध्ये केंद्र शासनाने संपूर्ण भारतात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार अधिनियम (विद्यमान नांव महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम) लागू केला आहे. तसेच, केंद्र शासनाने ज्या राज्यांनी पूर्वीपासून रोजगार हमी अधिनियम मंजूर केला होता, अशा राज्यांना केंद्र शासनाच्या अधिनियमातील कलम २८ अन्वये त्यांचा कायदा राबविण्याची मुभा दिली होती. तदनुसार महाराष्ट्र शासनाने सन २००६ मध्ये पूर्वीचा कायदा ठेवण्याचा पर्याय स्वीकारला आहे. मात्र, केंद्रीय कायद्यास अनुसरुन राज्यास निधी मिळण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुधारणा केल्या. त्यामुळे योजना राबविण्याच्या कार्यपध्दतीत बदल झाला आहे. सध्यस्थितीत राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (सन २००६ मध्ये बदल केल्याप्रमाणे) अंमलात आहे. या योजनेंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र ही योजना सुरु आहे.

२. **<u>वन विभाग व सामाजिक वनीकरण विभागाची कार्यान्वित यंत्रणा म्हणून त्यांची भूमिका</u>:**

कायद्याच्या तरतुदीनुसार कमीत कमी ५० टक्के कामे ग्राम पंचायतीमार्फत होणे आवश्यक आहे. तदनुसार ग्राम पंचायती मार्फत मोठ्या प्रमाणात कामे होत आहेत. त्याचप्रमाणे इतर कार्यान्वीत विभाग जसे वन, सामाजिक वनीकरण, पाटबंधारे, कृषी हे सुध्दा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राबवू शकतात. महाराष्ट्र वन विभागाचे महामंडळ शासनाचा अंगीकृत उपक्रम असल्यामुळे ते या योजनेंतर्गत कार्यान्वीत यंत्रणा म्हणून (लाईन एजन्सी) कामे घेवू शकतात.

शासन निर्णय, नियोजन विभाग (रोहयो प्रभाग) क्र.मग्रारोहयो-२०११/प्र.क्र.४७ /रोहयो-१०, दिनांक ३ ऑगस्ट, २०११ अन्वये मे २०१० मध्ये मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार तांत्रिक आणि प्रशासकीय मान्यतेचे विकेंद्रीकरण करुन हे अधिकार तालुका स्तरावर देण्यात आलेले आहेत. त्यानुसार सध्यस्थितीत, रुपये २५ लाखापर्यंतच्या प्रकल्पांना तांत्रिक मान्यता कार्यान्वीत यंत्रणेच्या तालुका स्तरावरील अधिकाऱ्याने द्यावयाची आहे आणि प्रशासकीय मान्यता ही तहसीलदार यांनी द्यावयाची आहे. तांत्रिक विभागाने विहित

विवरणपत्रात माहिती भरुन दिल्यानंतर त्या आधारे तहसीलदार प्रशासकीय मान्यता देतील. (शासन निर्णय, नियोजन विभाग (रोहयो प्रभाग) मग्रारोहयो- २०११/ प्र.क्र. ४३/रोहयो-१० , दिनांक ९ मे, २०११)

३. **<u>महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राबविण्यासाठी वन विभाग व सामाजिकरण विभागाचे कामाचे सुलभीकरण :-</u>**

जुनी रोजगार हमी योजना राबवितांना पूर्वी हजेरी सहायक आणि इतर कंत्राटी कर्मचारी वनाधिकाऱ्यांना योजना राबविण्यास मदत करीत होते. परंतु महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राबवितांना अनेक विभागांना अडचणी येत होत्या. त्या सर्वांचा काळजीपूर्वक अभ्यास करुन शासन निर्णय क मग्रारो-२०११/प्र.क्र.५४/रोहयो-१० दिनांक २७/५/२०११ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. तदनुसार सध्या ग्राम रोजगार सेवक / यंत्रणेचे तांत्रिक अधिकारी हजेरी व इतर नोंदी घेत आहेत. परंतु, भविष्यात ग्राम रोजगार सेवकानेच हजेरी घेणे आवश्यक असल्यामुळे तूर्त सहा महिन्याच्या कालावधीसाठी यंत्रणेच्या तांत्रिक अधिकाऱ्यांनी ग्राम रोजगार सेवकाला हजेरी घेण्याच्या कामामध्ये मदत करावी. तदनंतर ग्राम रोजगार सेवक स्वतंत्रपणे हजेरी व इतर नोंदी घेतील. हजेरी पटावरील मजुरांची उपस्थिती ग्राम रोजगार सेवकाने नोंदविल्यानंतर त्याची खात्री / पडताळणी वन विभागाच्या तांत्रिक संवर्ग / ग्राम सेवक यांनी करुन तसे प्रमाणित करतील. या कामासाठी ग्राम रोजगार सेवकांना २.२५ टक्के प्रमाणे तहसीलदार मार्फत मानधन देण्यात येते. या अनुषंगाने वन अधिकारी व सामाजिक वनीकरण अधिकारी/ कर्मचाऱ्यांना ग्राम पंचायतीच्या ग्राम सेवक व ग्राम रोजगार सेवक जे ग्राम सेवकाच्या नियंत्रणाखाली काम करतात त्यांच्या संपर्कात राहणे आवश्यक आहे.

शासन निर्णय दिनांक २५ मे, २००९ नुसार आठवड्याची उपस्थिती घेतल्यानंतर व केलेल्या कामाचे तांत्रिक विभागाने मोजमाप घेतल्यानंतर सदर हजेरीपट तहसीलदारांना हस्तांतरीत केल्यांनतर मजुरांना बँक व पोस्ट ऑफिस मार्फत मजुरी देण्याची जबाबदारी तहसीलदारांची राहील. शासन निर्णय क्रमांक मग्रो-२०११/प्र.क्र.५४/रोहयो-१०अ, दिनांक २७ मे, २०११ ची प्रत सोबत ठेवून त्यातील अटी व शर्तींचा अभ्यास करुन सर्व वन व सामाजिक वनीकरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी तसेच ग्राम सेवक व तहसीलदार कार्यालय यांनी सामूहिक जबाबदारीने काम करणे आवश्यक आहे.

४. **<u>योजनेची अंमलबजावणी करतांना ग्राम पंचायतीची प्रमुख भूमिका</u>** :-

जुनी रोजगार हमी योजना व महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये अनेक बाबी सारख्या आहेत. तथापि, महत्वाचा फरक हा ग्राम पंचायतीच्या भूमिकेबाबतचा आहे. मजुरांनी कामाची मागणी ग्राम पंचायतीकडे केल्यानंतर ग्राम पंचायतीमध्ये कामाच्या मागणीची नोंद करुन तदनंतर ग्राम पंचायतीमार्फत जॉब कार्ड देण्यात येते. ग्राम पंचायतीस संपूर्ण वर्षाच्या कामाचे नियोजन करण्याचे अधिकार असल्यामुळे वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सन २०१२-१३ करिता त्यांच्या कामाचा समावेश ग्रामपंचायतीच्या आराखड्यात करण्याच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी / तहसीलदारांच्या संपर्कात राहणे आवश्यक आहे. तसेच सन २०११-१२ मध्येसुध्दा आवश्यकतेनुसार गट विकास अधिकारी यांच्या मदतीने यावर्षात घेण्यात येणारी कामे सुध्दा ग्राम पंचायतीच्या आराखड्यात समाविष्ट करुन घ्यावीत.

जर वन विभागाचे एखादे काम विशिष्ट ग्राम पंचायत क्षेत्रात येत नसून किंवा अनेक ग्राम पंचायतीच्या क्षेत्रात येत असेल तर त्या पंचायत समितीची मान्यता घेवून काम हाती घेण्यात यावे.

५. **<u>कंत्राटदारांना मज्जाव</u>**

मग्रारोहयो अंतर्गत कुशल व अकुशल अशास दोन्ही प्रकारच्या कामांसाठी कंत्राटदारांकडून कामे करुन घेण्यास परवानगी नाही. म्हणून कार्यान्वयीन यंत्रणांनी (वन विभाग किंवा सामाजिक वनीकरण विभाग) यांनी सदर योजना स्वत: राबवावी.

६. **<u>६०:४० प्रमाण</u>**

कामांवर होणाऱ्या एकूण खर्चाच्या किमान ६०% खर्च हा मजूरीवर होणे अनिवार्य आहे. तसेच साधानसामुग्रीवरील खर्च ४० % पेक्षा जास्त असू नये. अर्धकुशल व कुशल कामावरील खर्च हा देखील साधन सामुग्रीचाच भाग आहे. अशा प्रकारे ६०:४० प्रमाण हे गट पातळीवर ठेवणे आवश्यक आहे.

७. **<u>मजूर विस्थापित करणारी यंत्रसामग्री वापरण्यावर प्रतिबंध</u>**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मजूर विस्थापीत करणारी अवजड यंत्रसामुग्री जसे JCB चा वापर करण्यावर बंदी आहे. याचे पालन न झाल्यास संबंधितांवर

शिस्तभंगविषयक कार्यवाही होऊ शकते. तथापि, ट्रॅक्टर किंवा तत्सम अन्य छोटी यंत्रसामुग्री आवश्यकतेप्रमाणे ६०:४० प्रमाणाच्या मर्यादेत वापरण्यास हरकत नाही.

८. **मजूरी वाटपाबाबत मार्गदर्शक सूचना**

दिनांक २७ मे, २०११ च्या शासन निर्णयाद्वारे दिलेल्या सूचनांनुसार यंत्रणांनी एकदा हजेरीपुस्तके (Muster Roll) तहसिलदार यांचेकडे सूपूर्त केल्यानंतर मजूरांना मजूरी प्रदान करण्याची जबाबदारी आता तहसिलदार यांची आहे.

तथापि वन विभाग / सामाजिक वनीकरण विभाग यांनी मग्रारोहयोची अंमलबजावणी करताना खालील गोष्टींचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

* वन / सामाजिक वनिकरण विभागाच्या कामांवर काम करीत असलेले मजूर स्थानिक असणे आवश्यक आहे किंवा जवळपासच्या ग्रामपंचायत हद्दीतील असावे. दूरवरुन मजूरांना कामावर आणण्यास परवानगी नाही.

* मजूरांकडे जॉब कार्ड असणे अनिवार्य आहे. जर त्यांच्याकडे जॉब कार्ड नसेल तर ते विहीत कार्यपध्द्तीनुसार ग्रामपंचायतीमार्फत लवकरात लवकर पुरविणे आवश्यक आहे.

* हजेरीपुस्तक (Muster) वर आठवड्याला गणना करणे आवश्यक आहे.

* मजूरांनी काम सुरु केल्यापासून १५ दिवसांत मजूरीचे प्रदान करणे आवश्यक आहे. म्हणजेच मोजमाप घेण्यात व तहसीलदार यांचेकडे सादर करण्यास अनावश्यक विलंब करु नये.

* मजूरीचे प्रदान रोखीने न करता बँक अथवा पोष्ट ऑफीसद्वारे मजूरांच्या खात्यावर करण्यात यावे. तहसीलदार यांनी दि. २७/५/२०११ च्या शासन निर्णयाप्रमाणे याबाबत कार्यवाही करावी.

* वन / सामाजिक वनीकरण विभागाची वृक्ष लागवड व अन्य कामे विखुरलेल्या स्वरुपात असल्याने आवश्यकतेनुसार जिल्हाधिकारींच्या ( जिल्हा कार्यक्रम समन्वयक ) निदर्शनास आणून या कामांकरिता १० पेक्षा कमी मजूर लावण्यास हरकत नाही.

९. **मजुरांकरिता सोयी सवलती**

* गावापासून ५ किमीपेक्षा जास्त अंतरावर रोजगार दिल्यास राज्यशासनामार्फत १० टक्के जास्त मजुरी अनुज्ञेय आहे.
* अकुशल रोजगार उपलब्ध न केल्यास दैनिक मजुरीच्या २५ टक्के बेरोजगार भत्ता देय आहे.
* कामावर पिण्याचे पाणी, प्राथमिक उपचार व बरोबर आणलेल्या ६ वर्षाखालील लहान मुलांना सांभाळण्याची सोय
* कामाच्या अनुषंगाने मजुरास वा बरोबर आणलेल्या लहान मुलास दुखापत झाल्यास रुग्णास सर्व रुग्णसेवा शासकीय खर्चाने व दैनिक मजुरीच्या ५० टक्के पर्यंत रक्कम सानुग्रह रुग्ण भत्ता, अपंगत्व वा मृत्यू आल्यास रुपये ५०,००० पर्यंत सानुग्रह अनुदान.
* प्रसुती रजा व कुटुंब नियोजनाकरिता सवलती

१०. **क्रमांकित हजेरी पुस्तक**

तहसिलदार प्रमाणीत क्रमांकाची हजेरी पुस्तके यंत्रणांसाठी देतील. सदर हजेरी पुस्तके (Muster) चेकबुक प्रमाणे काळजीपुर्वक जपावी. या क्रमांकित हजेरी पुस्तकांवरच ग्राम रोजगार सेवकाने हजेरीची नोंद घ्यावी. त्यासाठी हजेरी पुस्तके ग्राम रोजगार सेवकाकडे देण्यात यावीत. आठवड्याच्या शेवटी वन / सामाजिक वनिकरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी ती परत घ्यावीत व मजूरीची गणना करुन तहसिलदारांकडे मजूरीच्या प्रदानासाठी सादर करावीत.

भविष्यास अधिक सोपी e-muster व e-measrement books जी संगणकावर भरता येतील सादर करण्याचा मानस आहे.

११. **मोजमाप**

कामाचा आठवडा पूर्ण झाल्यानंतर त्वरीत मोजमाप घेण्याची कार्यवाही यंत्रणांनी करावी. केलेल्या कामाच्या प्रामणानुसार मजूरी प्रदान करावी. एखाद्या परिस्थीतीत मोजमाप घेणे शक्य नसेल जसे झाडांच्या रक्षणासाठी नेमलेल्या रखवालदाराचे वेतन किंवा दिनांक ३०/६/२०११ च्या शासन निर्णयाप्रमाणे बिहार

मॉडेल नुसार झाडांच्या रक्षणसाठी द्यावयाचे प्रदान असल्यास मग्रारोहयोच्या मजूरीच्या दराप्रमाणे (As per NREGS Wage Rate) प्रदान करावे अन्य कोणत्याही दराप्रमाणे करु नये.

१२. **कुशल भागाचे नियोजन करण्याबाबत**

दिनांक १५/१०/२०१० व २७/५/२०११ तसेच १३/१०/२०११ च्या शासन निर्णयाद्वारे कुशल कामावरील खर्च भागविण्याबाबत मार्गदर्शक सूचना व कार्यपध्द्ती देण्यात आली आहे. वन विभागाचे अधिकारी यांना याबाबत माहिती असेलच. कुशल खर्चाच्या पावत्या (Vouchers) पुरावा म्हणून जतन करणे आवश्यक आहे. दिनांक १३/१०/२०११ च्या शासन निर्णयानुसार कोणत्याही कामाच्या कुशल भागाच्या २५% इतका अग्रिम निधी प्लॅस्टीक बॅग व अन्य साहित्य खरेदी करण्यासाठी तहसिलदार यांचेकडून मिळू शकतो.

१३. **प्रशासकीय खर्च**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्ह्यांना ६% प्रशासकीय निधी केंद्र शासनाकडून देण्यात येतो. यापैकी काही भाग (०.५०%) शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१०/प्र.क्र. १२/ रोहयो-१४, दिनांक ११ नोव्हेंबर, २०१० च्या शासन निर्णयानुसार यंत्रणांना देण्याची तरतूद आहे. यंत्रणा सदर निधीची मागणी तहसिलदारांकडे करु शकतात व तहसिलदार यांनी सदर निधी त्यांना प्रदान करावा.

१४. **MIS वर माहिती नोंदविणे**

मग्रारोहयोचे एक ठळक वैशिष्टय म्हणजे सर्व प्रकारचा खर्च विहीत नमुन्यात ऑन लाईनने कळविणे हे काम तहसिलदार / पंचायत समितीच्या लिपिक / डाटा एन्ट्री ऑपरेटरकडून करता येते व केंद्र शासनाच्या वेबसाईटवर (nrega.nic.in) त्याची पाहणी करता येते.

म्हणून वन अधिकाऱ्यांना MIS साठी अचूक व नियमितपणे माहिती द्यावी. तहसीलदारांना MIS साठी मस्टरच्या अतिरिक्त झेरॉक्स/छायांकित प्रती देण्यात याव्यात आणि कुशल कामाची सर्व प्रमाणके MIS मध्ये नोंदविली पाहिजेत.

१५. **पारदर्शकता आणि सामाजिक लेखा परीक्षण / आंकेक्षण**

मगारोहयोमध्ये सामाजिक अंकेक्षण पारदर्शकता फार महत्वाची आहे. केंद्र शासनाने नुकतेच सुधारित केलेले सामाजिक आंकेक्षणाचे नियम व सूचना लवकरच आपणास पाठविण्यात येतील. यादृष्टीने वन व सामाजिक वनीकरण विभागाने लेखे योग्य पध्दतीने ठेवून आवश्यकती कागदपत्रे उपलब्ध करणे, ग्रामसभेच्या बैठकीत किंवा सामाजिक आंकेक्षणाचे वेळी प्रमाणके तपासून पाहणे, याकडे लक्ष दिले पाहिजे. तसेच प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी नावांसहित सर्व तपशील दर्शविणारा फलक लावणे आवश्यक आहे.

१६. **वनीकरणासाठी अतिरिक्त मनुष्यबळ**

नरेगाच्या कामासाठी कॉंट्रॅक्ट पध्दतीवर अतिरिक्त मनुष्यबळ वापरण्यासाठी केंद्र शासनाने अनुमती दिलेली आहे. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दि. १६/१२/२०१० च्या शासन निर्णयान्वये कंत्राटी तांत्रिक अधिकारी, लिपीक, लेखालिपीक यांच्या सेवा घेण्याबाबत सूचीत केले आहे. तदनुसार स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन व मर्यादेत वन विभागाच्या विशिष्ट कामासाठी तांत्रिक कर्मचारी वर्ग / सेवानिवृत्त कर्मचारी वर्ग नियुक्ती करण्याबाबत व ६ टक्के प्रशासकीय खर्चाच्या अनुदानातून त्यांचे मानधन अदा करण्याबाबत जिल्हाधिकारी व वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी चर्चा करुन संयुक्तरित्या निर्णय घ्यावा.

१७. **वेबसाईटवरील माहिती**

उपरोक्त विवेचनातील मग्रारोहयोबाबतचे सर्व शासन निर्णय व मूलभूत माहिती egs.mkcl.org या संकेतस्तळावर उपलब्ध असून अधिकारी आवश्यक वाटल्यास ती डाऊनलोड करुन क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडे त्याची प्रत पाठवू शकतात. सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांना शासन निर्णय परिचयाचे असून ते आपणास देऊ शकतील. याबाबत काही शंका उद्भवल्यास मंत्रालय स्तरावर उप सचिव (नरेगा) किंवा अवर सचिव (नरेगा) यांच्याशी संपर्क करता येईल.

केंद्र शासनाच्या अधिनियम (मग्रारोहयो) व नियमांसाठी nrega.nic.in या संकेत स्थळावरील माहिती पाहणे आवश्यक आहे, त्या अधिनियमाशी संबंधित अनुसूची १ व २ ची आवश्यकता भासल्यास ती डाऊनलोड करणे शक्य आहे.

हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला आहे. त्याचा संगणक संकेतांक २०११११०२१५१२४५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

वि. गिरीराज १.११.२०११

(वि. गिरीराज)
प्रधान सचिव (रोहयो)

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
अतिरिक्त मुख्य सचिव
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी
शासनाचे सर्व अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीकरिता)
प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर
कृषी आयुक्त, पुणे
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, ( लेखापरीक्षा) मुंबई / नागपूर
संचालक, सामाजिक वनीकरण, पुणे
संचालक, मृदसंधारण व्यवस्थापन, पुणे
संचालक, फलोत्पादन, पुणे
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद